१३/०९/२०२४

13.9.24


पुढारी

मंगळवार, १० सप्टेंबर २०२४



डॉ. अजिंक्य पत्रावळे


प्रा. डॉ. प्रशांत अनभुले


डॉ. दत्तात्रय चांदम


डॉ. अनिल गोरे


प्रा.डॉ. गोविंद कोळेकर


प्रा.डॉ. मधुकर देशमुख

# शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट

## कर्करोगावरील निदानासाठीची यंत्रणा विकसित करण्याचे ध्येय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट मिळाले. भविष्यात सोप्या पद्धतीने प्राथमिक टप्प्यात कर्करोगाच्या निदानासाठीची यंत्रणा विकसित करता आल्यास उपलब्ध असणाऱ्या औषधाचा वापर करून कर्करोगावर नियंत्रण मिळवता येईल, असे संशोधकांना वाटते.

विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. अजिंक्य पत्रावळे व शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. गोविंद कोळेकर, वरिष्ठ प्रा. डॉ. मधुकर देशमुख, भोगावती महाविद्यालय येथील डॉ. दत्तात्रय चांदम, ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकॅल सायन्स-सुरत येथील डॉ. अनिल गोरे यांनी संयुक्त प्रयत्नातून ड्रग लाईक मॉलिक्युल्स याची निर्मिती केली.

किमो उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदना, त्रास होतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी व अप्रभावित पेशीत फरक करता न येणे. याचा विचार करून निवडक प्रकारचे कंपाऊंड बनवणे व फक्त निवडक पेशीवर प्रभावी कार्य करण्याची योजना संशोधकांनी बनवली. त्याचा एक भाग म्हणून हरित पद्धतीचा वापर करत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड बनवून त्यांचे स्तनाच्या कर्करोगावर इन विट्रो पद्धतींनी तपासणी करण्यात आली. प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड स्तनाच्या कर्करोगावरील निवडक पेशीवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसून आले. परंतु, नॉर्मल पेशीवर त्यांचा प्रभाव पडताना दिसला नाही. इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड हे फक्त स्तनाच्या कर्करोगावरील पेशीवरच प्रभाव करतात का, हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवर देखील चाचणी घेण्यात आली. परंतु, अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसून आला नाही.

कोल्हापूर, मंगळवार, १० सप्टेंबर २०२४ सकाळ

S-10

# 'विद्यापीठ-विवेकानंद'च्या कर्करोगावरील संशोधनाला पेटंट

## सहा संशोधक प्राध्यापकांची यशस्वी कामगिरी

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापकांनी कॅन्सर (कर्करोग) बाबतच्या ड्रग लाईक मॉलिक्युल्सची निर्मिती केली आहे. त्यांच्या या संयुक्त संशोधनाला युके सरकारचे पेटंट मिळाले.

सहा संशोधकांनी पेटंट मिळविण्याची यशस्वी कामगिरी केली. त्यात विद्यापीठातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, गोविंद कोळेकर, मधुकर देशमुख, विवेकानंद कॉलेजमधील डॉ. अजिंक्य पत्रावळे, भोगावती महाविद्यालयातील डॉ. दत्तात्रय चांदम, सूरत (गुजरात) मधील ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सचे डॉ. अनिल गोरे यांचा समावेश आहे. सध्या किमोथेरेपीचा वापर करून कर्करोगावर उपचार केले जातात; पण उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदनेचा त्रास सहन करावा लागतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी आणि अप्रभावित पेशीमध्ये फरक करता येत नाही. त्याचा विचार करत अतिशय निवडक प्रकारचे कंपाउंड बनवणे. फक्त कर्करोगावरील निवडक पेशीवर प्रभावी पद्धतीने कार्य करावेत, अशी योजना संशोधकांनी बनवली आहे. संशोधनासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांचे सहकार्य लाभले.

**सर्वसाधारण पेशींवर परिणाम**

प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाउंड हे ब्रेस्ट कर्करोगावरील निवडक पेशींवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसले; परंतु नॉर्मल पेशींवर प्रभाव पडताना दिसत नाही. हे कंपाउंड फक्त ब्रेस्ट कॅन्सरवरील पेशींवरच प्रभाव करतात का? हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवरही चाचणी घेतली. मात्र, कोलन कॅन्सर किंवा अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसला नसल्याची माहिती डॉ. अनभुले यांनी दिली.


डॉ. अजिंक्य पत्रावळे


प्रा. डॉ. प्रशांत अनभुले


डॉ. दत्तात्रय चांदम


डॉ. अनिल गोरे


प्रा. डॉ. गोविंद कोळेकर


प्रा. डॉ. मधुकर देशमुख